RNI No. MAHBIL/2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ८, अंक ५८(२)] सोमवार, सप्टेंबर १२, २०२२/भाद्रपद २१, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ९७**

**प्राधिकृत प्रकाशन**

## नगरविकास विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय (मुख्य इमारत), ४ था मजला,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ सप्टेंबर २०२२.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.**

क्रमांक नमुंम-१२१५/प्र.क्र. १४/१५/नवि-२८.—ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा ४०) च्या कलम ३४१ अ च्या पोट-कलम (१ब) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा व त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (३) नुसार आवश्यक असल्याप्रमाणे पूर्वप्रसिद्धी केल्यानुसार, नगर विकास विभाग उद्घोषणा क्रमांक नमुंम-१२१५/प्र.क्र. १४/१५/नवि-२८, दिनांक ३१ मार्च २०१५ अन्वये महाराष्ट्र शासनाने, अनुसूची-एक मध्ये नमूद ठाणे जिल्हातील महसूली गावांचे स्थानिक क्षेत्र, ग्रामीण क्षेत्रातून नागरी क्षेत्रामध्ये संक्रमित होणारे क्षेत्र हे संक्रमणात्मक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करण्याचा आणि उक्त संक्रमणात्मक क्षेत्रासाठी दहिसर नगरपंचायत या नावाने नगरपंचायत घटीत करण्याचा आपला हेतू घोषित केला होता ;

आणि ज्याअर्थी, शासनास उक्त उद्घोषणा विखंडीत करणे इष्ट आहे, असे वाटते ;

त्याअर्थी, सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम (१९०४) चा १) चे कलम २१ आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) च्या तरतुदी व त्या संदर्भात शासनास समर्थ करणाऱ्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे उक्त नमुंम-१२१५/प्र.क्र. १४/१५/नवि-२८, दिनांक ३१ मार्च २०१५ रोजीची उद्घोषणा तात्काळ विखंडीत करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**कैलास बधान,**
शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya,Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,

dated the 12th September 2022.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

No. NMMC-1215/C.R.14/15/UD-28.—Whereas, *vide* Government Proclamation, Urban Development Department No. NMMC.1215/C.R.14/15/UD-28, dated the 31st March 2015, issued in pursuance of the provisions of sub-section *(1B)* of section 341A read with sub-section *(3)* of section 3 of the Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965), the Government of Maharashtra had announced its intention to specify the local area of revenue villages in the Thane District specified in the *Schedule-A* appended thereto being an area in transition from rural area to urban area, to be a transitional area and to constitute a *Nagar Panchayat* by the name of Dahisar *Nagar Panchayat* for the said local area ;

And whereas, the Government considered it expedient to rescind the said Proclamation ;

Now, therefore, in exercise of powers conferred by Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965), read with section 21 of the Maharashtra General Clauses Act (I of 1904) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby rescinds the Government Proclamation, Urban Development Department No. NMMC.1215/C.R.14/15/UD-28, dated the 31st March 2015.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

KAILAS BADHAN,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.